# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 21/12/2019 (शनिवार)
# (दुपार)

---

## विश्वासघात

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 6 कि.मी. मौजा दहेगाव शिवार सर्व्हीस रोड नैवद्यम हॉटेल जवळ येथे दिनांक 17/12/2019 चे 06:30 वा. ते 20:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– राकेश बिसनलाल वर्मा, वय 49 वर्ष, रा. वार्ड नं. 7, विवेक जागरती रोड, मंडीदिप ता. गोहरगज जिल्हा रायसेन (मध्य प्रदेश) हे रिलायबल कॅरीयर प्रा लि भोपालचे मॅनेजर असुन त्यांचे ट्रान्सपोर्ट कंपनीचा कंटेनर क्र. सीजी–04/एमटी– 5231 मध्ये ड्रायव्हर आरोपी नामे– 1) सईदखान अब्दुल हमीदखान, वय 62 वर्ष, रा. यशबाग स्टेडीयम, बाग फरदअबजा वार्ड नं. 42, मकान नं 160 तहसील हुजुर जि. भोपाल (मध्यप्रदेश) व 2) रामसींग दांगी, क्लीनर व त्याचे इतर साथीदार यांनी रिलायबल सिगारेट टोबॅको इंन्डस्ट्रीज कंपनी मण्डीदिप भोपाल (म.प्र) येथुन 834 नग सिगारेट भरलेले कारटुनचा लोड भरून क्लीनर रामसिंग दांगी व त्यांचे इतर साथीदार यांनी सिलबंद कंटेनर भोपाल वरून रायपुर (छत्तीसगढ) कडे जात असतांना दहेगांव (कोराडी) सर्व्हीस रोड वर नैवद्यम हॉटेल समोर कंटेनरचा सिल व ताटा तोडुन त्या मधील 656 नग सिगारेट भरलेले कारटुन किंमत 3,95,60,011/– रू. चा माल परिवहन करतांनी नमुद आरोपीतांनी संगनमत करून सदर मालाचा अपहार केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीतांविरुध्द कलम 407, 34 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक मदने हे करीत आहे.

## अज्ञात आरोपीकडून धानाच्या गंजीला आग

पो.स्टे. वेलतुर :– अंतर्गत 7 कि.मी. अंतरावरील मौजा सावंगी शिवार येथे दिनांक 19/12/2019 चे 18:00 वा. ते 6:00 वा. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादी नामे– गंगाराम विठोबा राऊत, वय 60 वर्ष, रा. फेगड, ता. कुही यांच्या शेतातील धानाच्या गंजीला आग लावली, त्यामुळे शेतातील कि. 3,00,000/– रू. चे नुकसान झाले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे.वेलतुर येथे अज्ञात आरोपी विरुध्द कलम 435 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलीस नाईक स्वाती लोखंडे या करीत आहे.

## निष्काळजीपणे गायीचा मृत्यू

पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 5 कि.मी. अंतरावरील कोल्हार शिवार येथे दिनांक 18/12/2019 चे 17:30 वा. ते दिनांक 19/12/2019 चे 16:30 वा. दरम्यान आरोपी क्र. 1) रमेश ठाकरे, वय 50 वर्ष यांने त्याच्या ठेक्याचे शेतात पिकाच्या सरंक्षणाकरीता शेतीच्या सभोवताल विद्युत करंटची बारीक तार लावले. फिर्यादी नामे– विजय भगवान ठाकरे, वय 55 वर्ष, रा. कोल्हार यांची लाल रंगाची गाय किंमत 70,000/–रू. ची हिला करंट लावलेल्या तारेला स्पर्श झाल्याने तीचा जागेवरच मृत्यू झाला. आरोपी क्र. 1) याने आरोपी क्र. 2) रामा थोटे, वय 30 वर्ष, 3) मारोतराव फाले, वय 45 वर्ष व 4) गोमू रमेश ठाकरे, वय 30 वर्ष, सर्व रा. कोल्हार यांच्या मदतीने पूरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने घटनास्थळावरून 300 ते 400 मीटर पर्यंत मृतक गाईला बैल बंडीला दोरीने बांधून पडीत जागेत टाकून दिले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीतांविरुध्द कलम 429, 201, 34 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार वडमे हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 37 कि.मी. अंतरावरील मौजा मोहगाव ढोले घाट येथे दिनांक 19/12/2019 चे 21:00 वा. दरम्यान एमएच–32/यु–6301 क्रमांकाचा मोटरसायकलचा चालक आरोपी नामे– प्रफुल बबनराव मडावी (मृतक), वय 31 वर्ष, रा. नवेगाव याने त्याच्या ताब्यातील मोटरसायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवित असतांना मोहगाव ढोले घाट रोडने जात होता. दरम्यान आरोपीचा मोटरसायकल वरील नियंत्रण सुटल्याने रोडच्या बाजुला असलेल्या दगडाला मोटरसायकलने धडक दिली. या अपघातात आरोपी हा जखमी झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– दिपक बबनराव मडावी, वय 31 वर्ष, रा. नवेगाव, ता. हिंगणा ह. मु. सालई माधवबाग ता. काटोल यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री. गव्हाणे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर